वार्तापत्र

जा.क्र. ३६९/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– २२/०७/२०१८

## '' अडयाळ पोलीस स्टेशन मधिल अधिकारी,कर्मचाऱ्यांचे निलंबण ''

दिनांक ७.०७.२०१८ रोजी पोलीस ठाणे अडयाळ हद्दीत निर्माण झालेल्या कायदा व सुव्यवस्था राखण्यास अपयशी ठरल्याणे १ अधिकारी व ११ कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे.

दिनांक ७.०७.२०१८ रोजी पोलीस ठाणे अडयाळ अंतर्गत मौजा सौंदळ येथे सायंकाळी ५.३० वा. सुमारास दोन गटामध्ये वाद होवुन वादाचे रूपांतर हानामारीत झाले सदर घटणा घडण्यामागे जनावारांची अवैध वाहतुक हे एक कारण असुन पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयामध्ये वाढ होणे व त्यामुळे लोकांची पोलीसांप्रती अविश्वासाची भावणा निर्माण होणे या घटणा कारणीभुत आहेत. घटणेनंतर पोलीस ठाणे अडयाळ परीसरातील लोकांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे गैरवर्तन व कामातील दिरंगाई याबाबत मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे कडे तक्रार केली व योग्य चौकशी करून त्यांचे विरूध्द कार्यवाहीची करण्याची मागणी केली होती त्यास अनुसरून मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांनी पोलीस स्टेशन अडयाळ येथिल अधिकारी व कर्मचाऱ्यांची तात्काळ चौकशी करण्याचे आदेश अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांना दिले. अपर पोलीस अधिक्षक यांनी स्वत:ह सखोल चौकशी केली-त्यामध्ये पोलीस ठाणे अडयाळ येथिल ठाणेदार स.पो.नि. यशवंत किचक, स.फौ. शदर गिऱ्हेपुंजे, पो.हवा. दादाजी कठाणे, म.पो.ना. दर्शना टेंभुर्णे, चालक पो.हवा. हरीष कांबळे, पो. हवा. ग्यानीराम बोरकर, म.पो.शि. मंगला शेळके, जितेंद्र भोगे, अरविंद सतदेवे, अनिल नंदेश्वर, भगतसिंग बैस, लिंगदेव निंबार्ते असे एकुण १ अधिकारी व ११ कर्मचारी यांनी पो.स्टे. अडयाळ येथे कार्यरत असतांना आपल्या कर्तव्यामध्ये कसुर केली तसेच नेमुण दिलेल्या कामांमध्ये दिरंगाई केली असे पो.स्टे. ला असलेल्या c.c.t.v. फुटेजची पाहणी करून तसेच अभिलेखावरील नोंदींची पडताळणीचे आधारे चौकशी मध्ये निष्पन्न झाले. सदरचे अहवाला

वरून पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांनी कर्तव्य कसुरी केल्याचे कारणावरून वरील अधिकारी, कर्मचारी यांना निलंबित केले. जिल्हयात सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी शिस्तीचे पालन करून आपले कर्तव्य चोखपणे पारपाडावे कर्तव्यात कसुरी केल्यास तसेच कामात दिरंगाई केल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही अशा सुचना सर्व अधिकारी कर्मचारी यांना दिल्या आहे. पो.स्टे. अडयाळ हद्दीत कायदा व सुव्यवस्थचा प्रश्न निर्माण झाला त्यामुळे जिल्हा पोलीस दलाची प्रतीमा डागाळली गेली. अशा प्रकारच्या घटणांची पुणरावृत्ती होवु नये तसेच पो.स्टे. ला येणाऱ्या सर्व तक्रारींची गंभिर दखल घेवुन विना विलंब योग्य कार्यवाही करावी. जन मानसात पोलीसांची प्रतीमा उजळ होईल अशी कामे भंडारा पोलीस दला मार्फत व्हावी अशा अपेक्षा आहेत. निलंबनाची कार्यवाही ही प्रशासकीय कामकाजाचा भाग असुन काही कसुरदार कर्मचाऱ्यामार्फत माध्यमांना चुकीची व अर्धवट माहिती देवुन केलेल्या कार्यवाही बाबत जनतेमध्ये खोटया बातम्या पसरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे जनतेला पोलीस दलास सहकार्य करून पुन्हा अशी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही व जनजिवन विस्कळीत होणार नाही. पुन्हा अशी घटणा घडल्यास संबंधीतांवर याहीपेक्षा कठोर शिक्षेची कार्यवाही करण्यात येईल.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र.९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.